# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक ०२.०६.२०२६ मंगळवार**

**(कामगिरी)**

**१) गुन्हेशाखा घरफोडी विरोधी पथकाची कामगीरी :— आंतरराज्यीय टोळीतील घरफोडी करणारे ०३ आरोपींना अटक, २२,१९,५००/—रू. चा मुद्देमाल हस्तगत.**

दिनांक ०१.०६.२०२६ रोजी, गुन्हेशाखा घरफोडी विरोधी पथकातील अधिकारी व अंमलदार यांना गुप्त बातमीदारामार्फतीने माहीती मिळाली की, बाहेरील राज्यातील अट्टल घरफोडी करणारे गुन्हेगार नागपुर येथे आलेले असुन, रेल्वे स्टेशन परिसरात फिरत आहेत. अशा खात्रीशीर माहीतीवरून, पोलीसांनी रेल्वे स्टेशन परिसर येथे तपासणी केली तसेच, तांत्रीक तपास करून परिसरातील व नागपुर शहरातील हॉटेल, लॉजेस, गेस्ट हाऊस चेक करीत असतांना, २१.१५ वा. चे सुमारास पोलीस ठाणे गणेशपेठ हद्दीत, हरनुर गेस्ट हाऊस, रजत प्लाझा, गणेशपेठ, नागपुर येथे एका रूममध्ये तिन ईसम मिळाले. त्यांना त्यांची नावे व पत्ता विचारला असता, त्यांनी त्यांची नावे १) राजु जसपाल सिंग, वय ४२ वर्षे, रा. १९७६/१०, वशिष्ठ कॉलोनी, मोहन नगर, थानेसर, जि. कुरूक्षेत्र, राज्य हरीयाणा २) भोला उर्फ बिरेंदर सुखदेव पासवान, वय ४० वर्षे, रा. गाव बहादुर, मेधछेपडा, पो. ठाणे मुशहरी बलोद, जि. मुजफ्फरपुर, राज्य बिहार ३) राजेश पारस शहा, वय ५२ वर्षे, रा. सिमरहीया, थाना मडोरा, जि. छपरा, राज्य बिहार असे सांगीतले. ईसमांवर संशय आल्याने, त्यांची विचारपूस करून, पंचासमक्ष त्यांचे सामानाची झडती घेतली असता, त्यांचेजवळ रोख १०,४५०/—रू., सोन्याचे वेगवेगळे दागिने एकुण वजनी १४३.५८ ग्रॅम, चांदीचे वेगवेगळे दागिने एकुण वजनी ११२.५ ग्रॅम, ०३ मोबाईल फोन व घरफोडी करण्यासाठी लागणारे साहीत्य असा एकुण २२,१९,५००/—रू. चा मुद्देमाल मिळुन आला. ईसमांना मुद्देमालाबाबत विचारणा केली असता, त्यांनी भुसावळ, जि. जळगांव (महाराष्ट्र) येथे घरफोडी केल्याची कबुली दिल्याने, नमुद ईसमांना कलम ३५(ब) भा.न्या.सं. अन्वये ताब्यात घेवुन, त्यांचे ताब्यातुन एकुण २२,१९,५००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. भुसावळ येथे खात्री केली असता, पो. ठाणे बाजारपेठ, भुसावळ, जि. जळगांव येथे फिर्यादी नारायण शिंदे, वय ५५ वर्षे, रा. न्यु हुडको कॉलानी, वांजोळा रोड, भुसावळ, जि. जळगांव यांचे घरी नमुद आरोपींनी घरफोडी केल्याचे निष्पण्ण झाले. आरोपींना मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव जळगांव स्थानिक गुन्हेशाखा पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. दिलीप चंदन, पोहवा. प्रविण रोडे, गणेश बरडे, प्रशांत गभणे, श्रीकांत उईके, पोअं. अमन राऊत व सुधीर पवार यांनी केली.



<u>२) गुन्हेशाखा, अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध पथकाची कामगिरी :—</u>

दिनांक १८.०१.२०२२६ चे २१.४५ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे सदर हद्दीत राहणाऱ्या ३९ वर्षीय फिर्यादी यांची १६ वर्षीय अल्पवयीन मुलगी ही राहते घरी कोणाला काहीही न सांगता घरून निघुन गेली होती. ती घरी परत न आल्याने, तीचा शोध घेतला असता ती मिळुन आली नाही, तीला कोणीतरी अज्ञात आरोपीने फुस लावुन पळवुन नेले, अशा फिर्यादी यांचे तक्रारीवरून पोलीस ठाणे सदर येथे कलम १३७ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासात गुन्हेशाखा, अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध पथकाचे अधिकारी व अंमलदार यांना दिनांक ०१.०६.२०२६ रोजी खात्रीशीर माहीती मिळाली की, नमुद मुलगी ही बाळापुर, पो. ठाणे गोबरवाही, जि. भंडारा येथे आहे. अशा माहीतीवरून गोबरवाही येथे जावुन नमुद मुलीचा शोध घेतला असता, ती श्रीमती सम्मी दुख्खु धुर्वे, वय ६२ वर्षे, रा. बाळापुर, गोबरवाही, जि. भंडारा यांचे घरी मिळुन आली. मुलीला ताब्यात घेवुन तिची सविस्तर विचारपूस केली. मुलीचे समुपदेशन करण्यात आले. नमुद मुलीला पुढील कारवाईस्तव सदर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपुर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपुर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपुर शहर, मा. श्री. राहुल माकणीकर पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांच्या मार्गदर्शनाखाली, मपोनि. ललीता तोडासे, पोहवा. सुनिल वाकडे, दिपक बिंदाणे, पोअं. शरीफ शेख व मपोअं. निलीमा बोरकर यांनी केली.



## (गुन्हे)

**१) पोलीस ठाणे भांडेवाडी :— घातक शस्त्रासह धुमधाम करणाऱ्या आरोपींना अटक.**

दिनांक ०१.०६.२०२६ चे २०.४० वा. चे सुमारास, भांडेवाडी पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना भांडेवाडी रेल्वे स्टेशन रोड, चैकट यांचे दुकानसमोर दोन ईसम सार्वजनिक रोडवर हातात तलवार घेवुन आरडा—ओरड करतांना दिसल्याने, त्यांना घेराव टाकुन, ताब्यात घेतले व त्यापैकी एकाचे हातातील तलवार काढुन घेतली. पंचासमक्ष त्यांना त्यांची नावे व पत्ता विचारले असता, त्यांनी १) प्रताप उर्फ चंचल लिलाधर नरवरे (ठाकुर), वय २३ वर्षे, रा. प्लॉट नं. १७, एकता नगर, भांडेवाडी, पारडी, नागपुर २) लतीफ ईस्माईल अगवान, वय ३८ वर्षे, रा. प्लॉट नं. २७८, जय दुर्गा नगर, भांडेवाडी, नागपुर असे सांगीतले. आरोपी क्र. १ चे ताब्यातुन एक लोखंडी तलवार किंमती ९००/— रू. ची जप्त करण्यात आली.

आरोपी हे दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने तलवार घेवुन धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे भांडेवाडी येथे आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का., सहकलम ३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपींना अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे नंदनवन :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ३०.०५.२०२६ चे ०५.०० वा. ते दिनांक ३१.०५.२०२६ चे १२.३८ वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे नंदनवन हद्दीत, प्लॉट नं. ५८/ए, शक्तीमाता नगर, खरबी चौक, गोस्वामी डेअरी जवळ, नागपुर येथे राहणाऱ्या फिर्यादी श्रीमती ज्योती नारायण बुजाडे, वय ६० वर्षे ह्या आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह महाराष्ट्र दर्शन करीता गेल्या असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लाकडी आलमारीतील रोख २५,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती १,९३,८००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नंदनवन येथे पोउपनि. पंडीत शिंदे ८५५४०९१५७० यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

## (मिसिंग)

**१) पोलीस ठाणे नविन कामठी :—** सौ. पुनम गणेशजी बावणे, वय २३ वर्षे, रा. उनगांव, कामठी, जि. नागपूर ह्या दिनांक ०४.०५.२०२६ चे ००.४९ वा. पासुन पोलीस ठाणे नविन कामठी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग— सावळा, चेहरा— गोल, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट १ इंच, डोळे— काळे, केस— काळे लांब, अंगात— पिवळ्या रंगाची साडी व ब्लाऊज घातलेले आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.

**२) पोलीस ठाणे हुडकेश्वर :—** उमेश साधुराम कोरी, वय ३२ वर्षे, रा. प्लॉट नं. २०५, श्रीकृष्ण नगर, मानेवाडा, बेसा रोड, नागपूर हे दिनांक १७.०५.२०२६ चे ०९.०० वा. पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग— सावळा, चेहरा— गोल, बांधा— मजबुत, उंची— ५ फुट ५ इंच, केस— काळे, अंगात— काळ्या हिरव्या रंगाची टि—शर्ट व निळ्या रंगाचा जिन्स पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात. सोबत— लाल रंगाची पल्सर गाडी क्र. एम.एच. ४९ बि.ए. ३९२० घेवुन गेले आहेत.

**<u>३) पोलीस ठाणे नविन कामठी</u> :—** दिनेश्वरी राजाराम भारद्वाज, वय २० वर्षे, रा. नयापारा डमरू, जि. बलोदा बाजार, छत्तीसगढ, ह.मु.— जिभकाटे यांचे शेतात, खैरी, कामठी, जि. नागपूर ही दिनांक २१.०४.२०२६ चे ०४.०० वा. पासुन पोलीस ठाणे नविन कामठी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तीचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **<u>वर्णन</u>** रंग— सावळा, चेहरा— लांबट, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट १ इंच, केस— काळे घुंगराळे व लांब, अंगात— पांढऱ्या रंगाचा सलवार सुट घातलेला आहे. भाषा— छत्तीसगढी/हिंदी बोलते. ओळख— उजव्या हातावर मॉं असे गोंदलेले आहे.

**<u>४) पोलीस ठाणे नविन कामठी</u> :—** मोहम्मद शाहीद अन्जुम वल्द जमाल अहमद, वय ५० वर्षे, रा. ईस्माईलपुरा, प्रायमरी शाळेमागे, कामठी, जि. नागपूर हे दिनांक ०६.०२.२०२३ चे ११.०० वा. पोलीस ठाणे नविन कामठी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **<u>वर्णन</u>** रंग— सावळा, चेहरा— लांबट, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट १० इंच, केस— काळे पांढरे, भाषा— हिंदी/मराठी बोलतात.


सौ. पुनम


उमेश


दिनेश्वरी


मोहम्मद शाहीद

**(ईतर)**

**<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्रं. ०२, नागपुर. | ३०४०१०४ /१९९७ | कलम ४०६ भा.दं.वि. | नमोद सदाशिव वानखेडे, रा. संजय नगर, पांढराबोडी, अंबाझरी, नागपुर. | ०४.०६.२०२६ |
| २. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्रं. ०२, नागपुर. | ३२४०१२१/ २००३ | कलम ३९२, ३४ भा.दं.वि. | रमेश फत्तुजी जाधव, रा. फकीरा सरस्वती नगर, धंतोली, नागपुर. | ०५.०६.२०२६ |

**स्वा/—**
**( राहुल रोटे )**
**पोलीस उपनिरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**